# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 03.03.2025** **वार-सोमवार**

---

**अधिवेशन**

राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला राज्यपालांच्या अभिभाषणानं आजपासून मुंबईत सुरुवात झाली. सर्व समाज घटकांना सोबत घेऊन सर्वसमावेशक, प्रगतीशील, पुरोगामी आणि विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी राज्य सरकार कार्यरत असल्याचं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी अभिभाषणात केलं. यावेळी त्यांनी राज्य सरकारच्या विविध योजनांचा आढावा घेतला. राज्य सरकारनं अधिवेशनाच्या आजच्या पहिल्याच दिवशी ६ हजार ४८६ कोटी २० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या दोन्ही सभागृहात सादर केल्या. विधानसभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या मागण्या मांडल्या. त्यात सर्वाधिक ३ हजार कोटी रुपयांहून अधिक मागण्या ग्रामविकास विभागाच्या आहे. या मागण्यांवर ६ आणि ७ मार्च रोजी चर्चा होणार आहे.

**दूधअनुदान**

पुणे तसंच राज्यात दूध अनुदान मिळत नसल्यानं दूध उत्पादक शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. शासनाने दूधदर वाढवून द्यावा किंवा दूध अनुदान वाढवून द्यावं, अशी मागणीही दूध उत्पादक शेतकरी करत आहेत. शासनाने 1 जुलैपासून प्रतिलिटर पाच रुपये दूध अनुदान जाहीर केलं असून जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यातील अनुदान पात्र दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा झालं आहे. काही जणांच्या तपशिलात त्रुटी आढळून आल्यानं त्या शेतकऱ्यांना अनुदान मिळालं नाही, त्यांच्या त्रुटी

दूर करण्याचं काम सुरू आहे. या महिन्याच्या अखेरीस पाच रुपये प्रतिलिटर दूध अनुदान शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग होईल. तसंच  यानंतर ऑक्टोबर, नोव्हेंबरमधील सात रुपये प्रतिलिटर दूध अनुदान कात्रज सहकारी दूध संघाच्या दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात होईल, असं कात्रज सहकारी दूध संघाचे उपाध्यक्ष तानाजी जगताप  यांनी सागितलं.

**एचएसआरपीनंबरप्लेट**

वाहनांना हायसिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट म्हणजे एचएसआरपी नंबर प्लेट बसवण्यासाठी ऑनलाईन माध्यमातून पैसे देताना अनेक नागरिकांना बनावट संकेतस्थळांचा सामना करावा लागत आहे. अशा फसव्या संकेतस्थळांनी केलेल्या फसवणुकीच्या तक्रारी समोर आल्या आहेत. या प्रकरणाची माहिती सायबर पोलिसांना देण्यात आली असून नागरिकांनी शासनाच्या अधिकृत संकेतस्थळाचाच वापर करावा, असं आवाहन पुण्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले यांनी केलं आहे.

**पुणेमनपा**

बचत गटातील महिलांना, विद्यार्थिनींना औद्योगिक क्षेत्रामध्ये संधी मिळावी, स्वयंरोजगार आणि औद्योगिक क्षेत्रातील माहिती व्हावी, या उद्देशानं पुणे महापालिकेच्या समाज विकास विभागानं  ७५ महिला उद्योजिकांच्या औद्योगिक उत्पादनांच्या प्रदर्शनाचं आयोजन केलं आहे. हे प्रदर्शन येत्या ७ ते ९ मार्च दरम्यान गणेश कला आणि क्रीडा मंच इथं भरवण्यात येईल, अशी माहिती महापालिकेचे उपायुक्त आणि समाज विकास विभागाचे प्रमुख नितीन उदास यांनी दिली.

**भाजपा**

पुणे शहर भाजपानं पाच लाख प्राथमिक सदस्यांच्या नोंदणीचा टप्पा पूर्ण केला असल्याची माहिती पक्षाचे पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी  दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पुणे शहर परिसरात मोठ्या प्रमाणात विकासकामं  सुरू आहेत. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत पुणेकरांनी या कामांना पसंती देऊन शहरातील भाजपच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी केले. त्याचेच प्रत्यंतर सभासद नोंदणीत दिसत असल्याचं घाटे यांनी म्हटलं आहे.

**<u>रागप्रभा</u>**

"किराणा घराण्याच्या विचारवंत गायिका डॉ. प्रभा अत्रे यांचे राग समय सिद्धातांविषयीचे विचार पुढील पिढीतील कलाकारांना उपकारक ठरतील" , असं  प्रतिपादन तालयोगी पंडित सुरेश तळवलकर यांनी काल पुण्यात केलं. डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशननं आयोजित केलेल्या 'रागप्रभा संगीतोत्सवामध्ये 'रागप्रभा विचार संचित'   या पुस्तिकेचं प्रकाशन पंडित तळवलकर यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते. या महोत्सवात ताकाहिरो अराई यांचं संतूर वादन, विदुषी अलका देव-मारुलकर यांचं गायन झालं; पंडित उल्हास कशाळकर यांच्या गायनाने महोत्सवाची सांगता झाली.

**<u>क्रीडा</u>**

हॉकी इंडिया, भारतीय क्रीडा प्राधिकरण आणि हॉकी महाराष्ट्र यांनी संयुक्तपणे  पुण्यात अस्मिता हॉकी स्टेट लीग स्पर्धा आयोजित केली आहे. येत्या 7 ते 14 मार्च या कालावधीत मेजर ध्यानचंद मैदानावर उप कनिष्ठ आणि कनिष्ठ अशा दोन गटात ही स्पर्धा होणार आहे. प्रत्येक श्रेणीतील संघ सुरुवातीला राऊंड रॉबिन लीगमध्ये खेळातील; त्यानंतर प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ बाद फेरीतील उपांत्य फेरीत खेळतील आणि त्यानंतर अंतिम फेरी होईल.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल 37 तर किमान 17 पूर्णांक 1 दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्या कमाल तापमानात किंचित घट होण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**